Registered with RNI
MAHABIL-06842/2013

BHAVMALA
Year-6, Issue-23 - Oct-Nov-Dec-2019

Printed Book/Periodicals
Book-Pocket

प्रति,
श्री./श्रीमती प्रा. डॉ. सुनंदाताई तेवले मॅडम
नांदुरा रेल्वे

If Undelivered return to :

प्रेषक :-
प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे
संपादक, भावमाला
ग्रीन पार्क-१, श्रीरामपूर,
पुसद, जि. यवतमाळ (महा.) ४४५२१५

www.bhavmala.com
ISSN2395-0366

# भावमाला

वर्ष-६ वे, अंक-२३, ऑक्टोंबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

• संपादक - प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे •




81

## अंतरंग


- **शोध निबंध-**
  १) स्त्रियांच्या काव्यातील भावविश्व - डॉ. लताताई थोरात
  २) मानावाधिकार आणि आदिवासी स्त्री - डॉ. सुनंदा रेवसे
  ३) नव्वोदोत्तर मराठी समीक्षा - डॉ. कल्पना मेहरे
  ४) आदिवासी कविता आणि लोकजीवन - डॉ. प्रल्हाद वावरे
- **परीक्षणे -**
  १) मन हळव्या पाऊस कविता-'मन पाऊस पाऊस' - वैशाली मुंगोले
  २) 'वंचितांच्या वेदना'-अभिव्यक्तीतून उमटणारी प्रखरकविता - प्रशांत ढोले
- **व्यक्तीविशेष -**
  १) ध. ग. उर्फ दादासाहेब बोबडे : एक गौरवान्वित व्यक्तीमत्व - डॉ. ज. पा. खोडके
- **कथा-**
  १) व्यर्थ न हो बलिदान - अय्युब पठाण
  २) याला काय म्हणावे... - गोपाल शिरपूरकर
  ३) 'ड्रेल्टा-१५'-एक हृदयस्पर्शी कथा - संकलक : चि. ओंकार मनिष व्यवहारे
- **कविता-**
  १) पेटेल का रे वाती?? - डॉ. अन्नपूर्णा चौधरी
  २) भावमाला - ध. ग. बोबडे
  ३) स्त्रीस्वातंत्र्य - वैशाली मुंगोले
  ४) अंधश्रद्धा - सुरेंद्र इंगळे
  ५) दप्तर गेले वाहून - प्रा. रामदास केदार
  ६) पुन्हा दरवळेल सारे - प्रा. सुनिल तोरणे,
  ७) खेयणं - राजेश चौरपगार
  ८) गझल - मसुद पटेल
  ९) शाई - रमेश बुरबुरे
  १०) सत्तेच्या आश्रये विसावतो अन्याय - पुंडलिक भेण्डे
  ११) राजा - विनय मिरासे 'अशांत'



हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्क क्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.




# संपादकीय....

मित्रांनो, 'दिपावली-२०१९' आपल्या सर्व हितचिंतकांना आनंदी, सुख, समाधान व आरोग्यदायी जावो, अशी भावमाला परीवाराच्या वतीने नम्र प्रार्थना... हा तेवीसावा अंक आपले हाती देतांना अत्यानंद होतो आहे...सक्रमनाच्या या काळात आपणा सर्वाकडून सहकार्याची अपेक्षा तर आहेच या बरोबरच आपण समाजाला जे काही देत आहोत त्या बाबत समाधानी आहोत का याचाही विचार करणे अगत्याचे आहे...माझे सर्व कवी-समीक्षक-लेखक मित्र अत्यंत तन्मयतेने आपले विचार या साहित्य पत्रिकेत मांडतांना दिसतात त्यांचे मी मनस्वी अभिनंदन करतो व भावी काळातही अशाच सहकार्याची अपेक्षा करतो. स्वप्न हे फलद्रूप कसे होतील?? त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल...आपले जीवन आज ज्या सुख-दु:खाच्या गर्तेतून जात आहे...ते कितपत आपल्याला सावरता येईल याचाही गंभीरतेने विचार करण्याची आवश्यकता आहे कोणतीही चळवळ ही सहकार्या शिवाय चालविता येणे शक्य नाही ज्यांची ऐपत असतांनाही काही मंडळी खर्च करायला कचरत असतात तर काही मंडळी अगदी अंक हाती ठेवताच आपले योगदान देतात अशा लोकांवरच ही चळवळ सुरू आहे...आपल्या साहित्य जत्रेतून जे काही मोडकंतोडकं आपल्यापुढे येते आहे ते आपल्याला वास्तवता मांडण्यासाठी पूरेसे आहेच, तरीही आपले विचार व आपली संस्कृती टिकविण्यासाठी आपणच प्रमाणीक धडपड करण्याची गरज आहे त्यासाठी बाहेरचे लोक येणार नाहीत आपली माणसं जेव्हा एखादं रोपटं लावल्यानंतर त्याला खतपाणी देण्यासाठी सक्षम नसतील तिकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असतील तर ती चळवळ पुढे जाणारचं नाही. आज आपण कुणालाही काही सांगू शकत नाही प्रत्येकजण जागृत आहे आपल्या प्रश्नां साठी झगडतो आहे तेव्हा साहित्यविचार सुद्धा त्यात थोडासा असाव अशी रास्त अपेक्षा माझ्यासारखा सामान्य अभ्यासक करणार त्यात गैर काय? आम्ही आज पराकोटीचे दिशाहीन आहोत आमचेच आम्हाला समजत नाही तर दुसऱ्याचा विचार आम्ही कसा करणार? असे गहन प्रश्न असलेल्या काळात आम्ही जगतो आहोत तेव्हा हा विचार करून आपली दिशा ठरविणे अगत्याचे आहे. स्वप्नांना पंख फुटावे यासाठी काही तर करावेच लागेल...आजची परिस्थिती अतिशय आव्हानात्मक आहे. तिला सावरणे सुद्धा आपल्याच हाती आहे. समाजात खुप टॅलेंट आहे, आज सोशल मिडियामुळे ते उजागर होते आहे...आमचा कोळी समाज खूपच मागासलेला आहे त्यात प्रस्थापित सरकार जी सत्तेवर आहेत ते आमचा बळी घेत आहेत. विशेष उल्लेखनिय बाब अधोरेखित करणे मी माझे कर्तव्य समजतो, आमची एक बहिण बहुचर्चीत अशा 'कोण बनेगा करोडपती' या नामांकित अशा 'शो' मधे सहभागी होवून एक करोड जिकलेली आहे ..आमच्या सर्व समाजबांधवांकडून सौ. बबिताताई ताडे, अंजनगाव सूर्जी यांचे मनस्वी अभिनंदन...सामान्य कुटूंबात राहून कष्टाचे काम करून एवढा सन्मान आज समाजाला मिळवून दिला त्यासाठी भावमाला परिवाराच्या वतीने सुद्धा त्यांचे अभिनंदन....व आभार पण...

**-प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे**

धन्यवाद !

# त्रैमासिक 'भावमाला' परिवाराकडून संशोधन लेख मूल्यांकन समिती (रिसर्च पेपर रिव्हिव्ह कमिटी)

(खालील प्रमाणे सत्र २०१८-२०१९ साठी नियुक्त केली आहे.)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. श्रीकृष्ण काकडे, अकोला | ९८५०२५००७९ |
| २. | प्रा. डॉ. नवनाथ गोरे, औरंगाबाद | ९४२३२६१११४ |
| ३. | प्रा. डॉ. गणेश चव्हाण, नागपूर | ९८५०३२४२९८ |
| ४. | प्रा. डॉ. संजय पाटील, वाशीम | ९२७२७७१७०० |
| ५. | प्रा. डॉ. उदय जाधव, खटाव, सातारा | ९४२३८०७५०५ |
| ६. | प्रा. डॉ. श्याम जाधव, जरूड, अमरावती | ९१५८७०१९८७ |
| ७. | प्रा. डॉ. अनिल बाभूळकर, अकोट, अकोला | ९९२१५८६८२८ |
| ८. | प्रा. डॉ. मंदाकिनी मेश्राम-रेवसे, अमरावती | ९६७३१६३१९२ |
| ९. | प्रा. डॉ. संतोष चव्हाण, अमरावती | ९८२२९४५९४३ |
| १०. | प्रा. डॉ. वर्षा चिखले, अमरावती | ८८०६०९६६९९ |
| ११. | प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे, अमरावती | ९४२३१५२९१२ |
| १२. | प्रा. डॉ. रूपेश कऱ्हाडे, दिग्रस, यवतमाळ | ९४२२८२२९६९ |
| १३. | प्रा. डॉ. विनायक त्रिपत्तीवार | ९०७०९३१९६७ |
| १४. | प्रा. डॉ. शरद वाघोळे, मंगरूळ पीर, वाशीम | ९४२१७४५३३५ |
| १५. | प्रा. डॉ. सुनंदा रेवसे, नांदुरा रेल्वे | ९४२१७४६९७५ |
| १६. | प्रा. डॉ. लता जावळे/खडसे, मालेगांव | ७८७५९९३२४० |
| १७. | प्रा. डॉ.माधव जाधव, नांदेड | ९४२३४३९९९१ |



# स्त्रियांच्या काव्यातील भावविश्व

- प्रा. डॉ. लताताई थोरात

अगदी लहानपणापासून लेक म्हणजे परक्याचे धन, पोरीच्या जातीला हे सर्व कशाला? उद्या आपल्या घरी आल्यावर नाही मिळालं तर...चूलीतल्या लाकडानं चूलीतच जळावं...या ना त्या कारणाने लहानपणापासून मुलीवर बंधने घातली जातात, या मानसिकतेतून जगताना हे आपले खरे घर नाही. लग्न झाल्यावर आपण आपल्या हक्काच्या घरी जातो. लग्न होणे म्हणजे मुलीच्या इती कर्तव्यता अशी समजूत तयार तयार होते जिथे आई-वडिलांच्या घरी स्वातंत्र्यावर बंधने होती तिथे सासरी गेल्यावर तर सर्व माणसे परकीच...ती सर्व माणसे अनोळखी...त्यांच्याशी जूळवून घेण्यात स्त्रीचे आयुष्य जाते.

अशावेळी आपल्या हक्काचं कुणी असावं आपल्या मनाचे गुज कोणाजवळ उलगडून दाखववावे, मनाचा कोंडमारा कुठेतरी मोकळा करावा असं जेव्हा वाटेल तेव्हा तीने जवळ केले गीताला...जात्यावर दळतांना बाणाऱ्या ओवीतून ती आपली व्यथा मांडू लागली...सुख-दुःख मांडायला लागली. शिक्षणाचा गंध नाही, सामाजिक, आर्थिक स्वातंत्र नाही. चूल आणि मूल हेच तिचे सर्वस्व असं सतत बिंबविल्या जात असे...अशावेळी तिने या गितांचा सहारा शोधला. आपले मन आपल्याजवळ मोकळे करायला लागली, आपल्या मनाची स्पंदने हळूवारपणे शब्दाच्या माध्यमातून म्हणी, लोकगीते, ओवी यामधून आपली भावना तिने मांडली अंतरंगातले गहिरे भाव अलगदपणे ओठातून बाहेर पडायला लागले. त्यातील सहज सुलभता, मनाची व्याकुळता तिचे सर्व अंगाने असणारे नातेसंबंध, तिच्या आशा आकांक्षा, तिचे स्वतःचे स्थान अस्तित्व या सर्वाविषयी मूक मनाने ती गीतांतून बोलायला लागली. स्त्रियांनी रचलेल्या ओवी, अभंग, लोकगित, कविता यामधून तिच्या बालपणापासून तर शेवटच्या क्षणांपर्यंतच्या सर्व जीवनाचा आलेख आपल्याला पहायला मिळतो, तिच्या अंतरंगातले भाव जाणवतात.

बालपणातील माहेरचे सुख तिला लग्न झाल्याबरोबर दूर गेल्याचे दिसून येते. आई वडिलांचं कोडकौतुक भावाबहिणीची माया, खेळण्याबागळण्याचं वय पण लग्न होताच फार मोठी जबाबदारी तिच्यावर पडते. आणि ती गोंधळून जाते. अशावेळी तिला आपले बालपणातील दिवस आठवतात.

'माय तुया परी मिनं काम नाही केलं
राजनाचं पाणी मले कोसावानी झालं...'

## अंतरंग


- **शोध निबंध-**
  - १) स्त्रियांच्या काव्यातील भावविश्व – डॉ. लताताई थोरात
  - २) मानावाधिकार आणि आदिवासी स्त्री – डॉ. सुनंदा रेवसे
  - ३) नव्वोदोत्तर मराठी समीक्षा – डॉ. कल्पना मेहरे
  - ४) आदिवासी कविता आणि लोकजीवन – डॉ. प्रल्हाद वावरे
- **परीक्षणे-**
  - १) मन हळव्या पाऊस कविता-'मन पाऊस पाऊस' – वैशाली मुंगोले
  - २) 'वंचितांच्या वेदना'-अभिव्यक्तीतून उमटणारी प्रखरकविता – प्रशांत ढोले
- **व्यक्तीविशेष -**
  - १) ध. ग. उर्फ दादासाहेब बोबडे : एक गौरवान्वित व्यक्तीमत्व – डॉ. ज. पा. खोडके
- **कथा-**
  - १) व्यर्थ न हो बलिदान – अय्युब पठाण
  - २) याला काय म्हणावे... – गोपाल शिरपूरकर
  - ३) 'डेल्टा-१५'-एक हृदयस्पर्शी कथा – संकलक : चि. ओंकार मनिष व्यवहारे
- **कविता-**
  - १) पेटेल का रे वाती?? – डॉ. अन्नपूर्णा चौधरी
  - २) भावमाला – ध. ग. बोबडे
  - ३) स्त्रीस्वातंत्र्य – वैशाली मुंगोले
  - ४) अंधश्रद्धा – सुरेंद्र इंगळे
  - ५) दमर गेले वाहून – प्रा. रामदास केदार
  - ६) पुन्हा दरवळेल सारे – प्रा. सुनिल तोरणे,
  - ७) खेयणं – राजेश चौरपगार
  - ८) गझल – मसुद पटेल
  - ९) शाई – रमेश बुरबुरे
  - १०) सत्तेच्या आश्रये विसावतो अन्याय – पुंडलिक भेण्डे,
  - ११) राजा – विनय मिरासे 'अशांत'



हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्क क्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.




# मानवाधिकार आणि आदिवासी स्त्री (संदर्भ आजचा)


- डॉ. सुनंदा रेवसे


आदिवासींचे जीवन हे निसर्गनिष्ठ आहे. त्याला निसर्गाशी जन्मतःच जुळवून घेता येते. त्यामुळे तो विकृती पेक्षा प्रकुतीच्या समीप आहे. परंतु जेव्हापासून जंगल कायदा आला आणि जंगलातील लाकडे, मध, डिंक, मोहाची फुले, तेंदूची पानं तोडण्यावर बंदी आली तेव्हापासून त्याची जीवनशेली खंडीत झाली. शिकार करण्यावर बंदी असल्यामुळे त्याच्या वाख्यांना पारावार राहिला नाही. डोंगर, दऱ्या खोरे, घनदाट अरण्यात राहणाऱ्या आदिवासींच्या जगण्याची आज साधनेच हिरावल्या गेली. त्यामुळे एकेकाळचा हा जंगलचा राजा हवालदील झाला आहे. त्याच्याबद्दल-

"जंगलाचा राजा । म्हणू नये कोणी,
टाळूचेच लोणी । खाती सारे..."

असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

एकीकडे भीषण दारिद्र्य तर दुसरीकडे त्याच्या रक्तावर जगणारे शोषक...ज्याच्या घरी संस्कृती पाणी भरत होती तेच आज चणे, फुटाणे, कंदमुळे खावून जगावेत त्यांच्या हक्कावर झेल घेवून तेच झपाटले जावेत. ही जीवघेणी विषमता थांबणे आत्यंतिक गरजेचे आहे. कारण मानवी समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आदिवासी आजमितीस सुद्धा उपेक्षित आहे. कायदा करणारे, राबविणारे, अंमलबजावणी करणारे, मूल्यांकन करणारे व श्रेणी ठरविणारेही तेच असतात. आदिवासींचा विकास करण्यासाठी नेमकी कोणती गरज आहे? काय अत्यवश्यक आहे? नेमकी निकड काय? ह्याचा विचार करणाऱ्या समितीमध्ये एकही आदिवासी नसतो असलास तर तो अपवाद समजावा. कुलरच्या हवेत एसी मधून फिरणारे सत्ताधिश आदिवासींच्या योजना करतात. शासन निर्णय घेतो. परंतु त्याची भूक व त्याचे दुःख त्याचा अंतस्थ टाहो, त्याचा आक्रोश शासनाला ऐकू येत नाही. हे आजचे समाजवास्तव आहे. म्हणून म्हणावेसे वाटते-

"माणसे म्हणवता स्वतःला, बर्ताव नीच राक्षसावानी
गुलाम राहिला वनवासी, देशात स्वतंत्र ना कुणी..."

स्वातंत्र मिळून आज ६-७ दशकं उलटली. पण तरीही आदिवासी स्त्रीची दशा नाही पालटली. त्यांचा देह उघडा, नागडा, नंगा बोडकाच राहिला हे सामाजिक भीषण वास्तव आजही बदललं नाही आदिवासी महिला दयनिय स्थितीत आहे. तिचे जीवनच कष्टमय मालिका ओवते यासंदर्भात क्षेत्रीय संशोधन करतांना माधुरी साकुळकर छत्तीसगडमधील

...ा संदर्भात सांगतात-मोठ्यांकडून पिळवणूक, फसवणूक प्रचंड गरीबी, ... बरोजगारी यामुळे छत्तीसगडी आदिवासी स्त्रिया बळी पडतात. १२ ते १८ ... गरीबीमुळे, चांगलं जगण्याच्या आशेने, शहरी जीवनाच्या आकर्षणाने [illegible] मुंबई अशा शहरात मोठमोठ्या बंगल्यावर घरकामासाठी जातात.

फक्त दिल्लीत छत्तीसगढहून घरकामासाठी आलेल्या जवळपास एक लाख मुली आहेत रोजगार व्यवसायासाठी अन्य ठिकाणी स्थलांतर करणे हा काही गुन्हा नाही पण या मुलींच्या वाट्याला फारच वेदनादायक जीवन येते. मानवी हक्क आणि मानवी मूल्य त्यांच्या जगात जणू अस्तित्वातच नाहीत.

दरवर्षी प्रत्येक तालुक्यातून जवळपास पाचहजार मुली दिल्ली, मुंबई, गोव्याला जातात. इथेच खरी त्यांच्या शोषणाला सुरूवात होते. आदिवासी मुलींना कपडे, सौंदर्यप्रसाधने आणि मनोरंजनाच्या साधनांचे आमीष दाखवून शहरात नेणाऱ्या दलालांचा धंदा तेजीत चालतो. जॉब-प्लेसमेंट यां गोंडस नावाखाली जवळजवळ पाचशे एजन्सी दिल्लीत आहेत प्रत्येक एजन्सीचे अंदाजे १५०-२०० एजंटस् आहेत. जे मुलींना फसवून दिल्लीला आणतात. ऑफीसमधून ह्या सर्व मुली सर्व प्रकारच्या कामासाठी अगदी मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्या व्यवसायासाठी, कुणाला भेट द्यायला, परदेशात घरकामासाठी, मुलं सांभाळायला या एजंसीकडून पुरविल्या जातात. मुक्त लैंगिक जीवनामुळे गुप्तरोगाच्या भीतीने श्रीमंतांना रोग होवू नये म्हणून 'व्हर्जीन' मुलगी हवी असते त्यासाठी ते कितीही पैसा द्यायला तयार असतात. काळा पैसा खर्च करून व्हर्जीन मुली मिळवणं हा त्यांचा आनंदाचा मार्ग असतो. आणि इथे कोवळ्या कोवळ्या कळ्या कुस्करल्या जातात. खरं म्हणजे १८ वर्षापेक्षा लहान मुलांना कामावर ठेवणे कायद्याने गुन्हा आहे. कॉन्झवेशन ऑफ चॉईल्ड रॉईट्सचे ते उल्लंघन आहे. आपल्याकडे मुलींची वाहतूक करणे, त्यांना वेशया मार्गाला लावणे याला प्रतिबंध करण्यासाठी दोन कायदे आहेत 'सीता' आणि 'पिटा' कायदा सपरेशन ऑफ इमरर्सल टॉरफिटिग ॲक्ट या कायद्याअंतर्गत एजंटला शिक्षा करता येत नाही कारण ते घर कामासाठी मुलींना नेतात. त्यामुळे एजंटाविरूद्ध गुन्हा दाखल करण्याचा प्रश्न उरत नाही.

मात्र याचा परिणाम असा होतो की, मालकीन फिरायला गेली की मालक घरी येतो, बेडरूममध्ये जेवन आणायला सांगतो आणि बेडरूममध्ये तो नागडा होवून बसलेला असतो. अशावेळी नोकरी सोडणे हाच पर्याय या मुलींजवळ उरतो. दिल्ली, गोवा, मुंबईला राहणाऱ्या या मुलींसोबत त्यांच्या समाजाचा मुलगा लग्नही करायला सहसा तयार नसतो. इतकी हायफाय मुलगी आपल्याला सांभाळता येणार नाही असे वरपक्ष म्हणतो नतीजा



असा होतो की, ह्या मुली आयुष्यभर अविवाहित राहतात. आई-वडिलांच्या संसारासाठी खस्ता खात राहतात कारण आतापर्यत ती ३-४ हजार रूपये तरी आपल्या बापाला देत आली. बाप खुश राहतो कारण इतके पैसे त्याने कधी क्वचितच पाहिले असतात. ते पैसे त्याला दारूची नशा करायला पुरेसे असतात. या मुलींच्या स्थलांतरासाठी पुढील परिस्थिती कारणीभूत ठरते-

१) प्रचंड गरीबी, दारिद्र्य रेषेखालचे जीवन
२) भूकंप, कोरडा दुष्काळ, नैसर्गीक आपत्तीने आलेली अगतीकता
३) गावात रोजीरोटीचे साधन नसणे
४) चांगले भविष्य जगण्याचा सोस असणे.

कोणत्याही घरातील मुली शहरात पाठवू शकतो याची गावात फिरणारे फेरीवाले, सरपंचाचे चमचे यांना बरोबर माहिती असते. कुणाच्या घरी खायला काही नाही, कुणाच्या घरी मुलींची संख्या जास्त आहे यांच्यामार्फत एजंटकडे माहिती जाते. एजंट सावकार म्हणून गावात येतो आणि अशा प्रकारे पुढचा पिळवणूकीचा प्रवास सुरू होतो.

शहरात गेलेल्या मुलींना त्यांच्या घरचे नियमीत फोन करतात. त्यामुली नियमीत मनीऑर्डर करतात. नाताळाला किंवा वर्षादोन वर्षातून एकदा घरी येतात पण काही मुलींचा ठावठिकाणा लागत नाही. अशा मिसिंग मुलीची संख्या खूप आहे. राष्टीय मानवाधिकाराच्या सर्वेनुसार ६०००० मुली मिसिंग आहेत. सरगुजा जिल्ह्यातील सीतापूर तालुक्यातीलराजोरी गावातल्या कुदुरापाणी या पाऱ्यातल्या गुड्डी आणि मुंडरी यादोन मुली पंधरा वर्षापासून बेपत्ता आहेत. जरापूर तालुक्यातील १०-११ वर्षाच्या मुलीचा काहीही पत्ता नाही. त्यांचे आईवडिल मात्र मुलगी कमाई करायला गेली आहे या आशेवरच बसले आहेत.

वरवर पाहता आपणास आदिवासी स्त्रियाअत्यंत सुंदर दिसतात. त्यांच्या जीवनावर आम्ही रेखाटने काढतो. त्यांची चित्रे काढतो मात्र सत्य हे आहे की,

"ते उपाशी आहेत
पण माणसांचे मांस खात नाहीत,
नग्न आहेत
मात्र दुसऱ्याचे वस्त्रहरण करत नाहीत,
तहानलेले आहेत
पण इतरांचे रक्त पित नाहीत,
त्यांच्या डोक्यावर छत नाही
तरीही ते दुसऱ्यांसाठी छत बांधतात...'

तात्पर्य...

भारतामध्ये कायद्यापुढे सर्व समान आहेत परंतु अद्याप पुरूष प्रधान संस्कृतीला अधिक उच्चत्तम मानण्यात येवून स्त्रियांच्या हक्कांचे इथे सर्रास हनन चालू आहे. त्यामुळे समाजातील हिस्त्र प्राण्यांपासून दुर्बल व्यक्तींच्या सरंक्षणाची नितांत गरज आहे. जोपर्यत सामाजिक दृष्ट्या स्त्री ही दुय्यम आहे ही धारणा संपुष्टात येत नाही तोपर्यत सामाजिक समता स्थापित झाली असे खऱ्या अर्थाने म्हणता येणार नाही. स्त्रीचा वस्तुकरणाकडून व्यक्तीकरणांकडे निकोप प्रवास ज्यादिवशी होईल त्याच दिवशी डॉ. बाबासाहेबांचे एकूणच भारतीय स्त्रीच्या उत्थानाचे स्वप्न पूर्ण होईल आणि त्याच दिवशी गाणं गायलं जाईल-

'हे माणसा,
इथे मी तुझे गीत गावे,
असे गीत गावे
की, तुझे हित व्हावे, एकाने रडावे आणि अनेकांनी हसावे
असे आता कधी न व्हावे.....


* संदर्भ सुची-

१) आदिवासी प्रश्न-गोविंद गारे, आदिम प्रकाशन, पुणे
२) आदिवासी साहित्य-डा. विनायक तुमराम, वितय प्रकाशन, नागपूर
३) आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या-संपादक प्रमोद मुनघाटे, प्रतिमा प्रकाशन, नागपूर
४) आनंदोत्सव-आदिवासी विशेषांक १ नोव्हे. २००८
५) स्वातंत्र्य कुणाच्या दारी-शंकरराव खरात, प्रतिमा प्रकाशन, नागपूर
६) उत्थानगुंफा-यशवंत मनोहर



-प्रा. डॉ. सुनंदा रेवसे
नांदूरा रेल्वे, जि. अमरावली


***


अंजनी पब्लिकेशन्स
ग्रीनपार्क नं. १, श्रीरामपूर, पुसद जि. यवतमाळ
संपर्क : ९४२१७७१७३३, ८८३०३२४१०९
आमचे कडे आयएसबीएन क्रमांकासह योग्य दरात पुस्तके तयार करून मिळतील.




# "नवोदोत्तर मराठी समीक्षा"


-प्रा. डॉ. कल्पना मेहरे-यावले


विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी साहित्य प्रांतात सामान्यता अभिजनवादी साहित्याचा बोलबाला होता. त्यामुळे संस्कृत काव्यशास्त्र आणि विविध पाश्चात्त साहित्य संप्रदाय यांच्या आधारावर समीक्षा झालेली दिसून येते. नवसाहित्याने विशेषत: मर्ढेकरी सौंदर्यविचाराने त्या साहित्यविचाराला पहिला धक्का दिला. व मराठी समीक्षेत सौंदर्यशास्त्रीय संकल्पनांचा उदय झाला. साठोत्तर विविध वाङ्मयीन प्रवाहांना वरील सारे संचित अपुरे वाटू लागले. व समीक्षेतील सारे संकेत धुडकावून त्यांची साहित्य निर्मिती सुरू राहिली.१९६० ते १९९० या काळात प्राधान्याने लौकिकतावादी समीक्षादृष्टीचा प्रभाव राहिला असून आदिबंधात्मक समीक्षा, शैली वैज्ञानिक समीक्षा, व समाजशास्त्रीय समीक्षा याचा कमी अधिक प्रभाव उपयोजित समीक्षेवर दिसून येतो. साहित्य प्रकारांच्या वर्गीकरणाच्या/वंशाच्या संकल्पनेस अनुसरून साहित्याची प्रकारनिष्ठ समीक्षा सुद्धा झाली आहे. प्रस्तुत निबंधात याचा थोडक्यात आढावा घेण्यात येईल व नव्वोदोत्तर मराठी समीक्षेची दिशा काय आहे व असावी याची चर्चा करण्यात येईल.

१९९० नंतर समीक्षेत कोणताही नवा विकास झाल्याचे दिसत नाही. अभिजन साहित्याने १९६० पर्यंत दिलेले मूल्यनिकषच थोड्याफार फरकाने समीक्षक वापरत आहे. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी या प्रवाहांमध्ये नवा कोणताही समीक्षा सिद्धांत विकसीत झाला नाही मात्र डॉ. शरद पाटील, आणि प्रा. भालचंद्र नेमाडे या दोघांनी नवा समीक्षा सिद्धांत देण्याचा प्रयत्न केला पण सफल झाला नाही. अशा परिस्थितीत १९८४-१९९३ दरम्यान विकसित झालेला जनसाहित्यविचार १९९५ च्या सुमारास साहित्य समीक्षा पद्धतीला परिणत झाला. जनसाहित्य समीक्षा पद्धतीने साहित्याच्या अस्सलतेचा आणि श्रेष्ठतेचा नवा मूलयनिकष जननिष्ठा हा दिला.व त्या आधारे नवी समीक्षा पद्धती प्रचारात आणली. 'जन' ही त्यातील केंद्रीय संकल्पना आहे. जन म्हणजे निखळ माणूस. वर्ण-वर्ग-धर्म-पक्ष-पंथ-जात-लिंग-निरपेक्ष माणूस/उपाधी निरपेक्ष माणूस. भारतीय संविधानाचाही रोख निखळ/उपाधिनिरपेक्ष माणसाकडेच आहे. एक माणूस-एक मत ही समानता भारतीय संविधानात आहे. असेही म्हणता येईल कीजनसाहित्य समीक्षा ही संविधानवादी समीक्षा आहे. सगळ्याच प्रकारच्या साहित्याची समीक्षा संविधानिक समीक्षेने म्हणजे जनसाहित्य समीक्षेने होवू शकते. जननिष्ठा म्हणजे माणूसकीवर अखंड अभंग निष्ठा(=जनांप्रती समर्पितता)